LIVE महाराष्ट्र 24

महाराष्ट्राचे निर्भीड, निःपक्ष आणि विश्वासार्ह दैनिक वृत्तपत्र • सत्य, निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारिता

महाराष्ट्र | गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६

महाराष्ट्र

भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त साताऱ्यात आठवडाभर विविध उपक्रमांची पर्वणी!

११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान जनजातीय गौरव सेवा सप्ताह; १५ नोव्हेंबरला गौरव दिनाचा मुख्य सोहळासातारा, दि. १२ : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंती...

LIVE MAHARASHTRA 24 | गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६



भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त साताऱ्यात आठवडाभर विविध उपक्रमांची पर्वणी!

११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान जनजातीय गौरव सेवा सप्ताह; १५ नोव्हेंबरला गौरव दिनाचा मुख्य सोहळासातारा, दि. १२ : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त सातारा जिल्ह्यात ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जनजातीय गौरव सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच १५ नोव्हेंबर रोजी जनजातीय गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिली.या सप्ताहांतर्गत १३ नोव्हेंबर रोजी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, पीएम जनमन, न्यूक्लियस बजेट, महिला बचत गट आणि कृषी योजनांमधील पात्र लाभार्थ्यांना लाभवाटप व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. १४ नोव्हेंबर रोजी आदिवासी स्मारके व पुतळ्यांची स्वच्छता, दीपोत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.१५ नोव्हेंबर रोजी जिल्हा, तालुका व मंडळ स्तरावरील शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस अभिवादन करून जयंती साजरी करण्यात येईल. यावेळी पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्ती, समाजसेवक आणि आदिवासी मान्यवरांचा सत्कारही करण्यात येणार आहे.१६ नोव्हेंबर रोजी आधार दुरुस्ती, वनपट्टेधारक लाभ, शेतकरी नोंदणी व पीकविम्यासाठी विशेष सेवा शिबिरे भरविण्यात येतील. १७ नोव्हेंबर रोजी आरोग्य तपासणी, सिकलसेल जनजागृती व माता-बाल पोषण मार्गदर्शन, तर १८ नोव्हेंबर रोजी कौशल्य विकास, रोजगार, जात वैधता आणि आर्थिक साक्षरता याविषयी मार्गदर्शन करून सप्ताहाचा समारोप करण्यात येणार आहे.सप्ताहादरम्यान आदिवासीबहुल भागांमध्ये शोभायात्रा, लोककला सादरीकरण आणि क्रीडा स्पर्धांचेही आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व उपक्रमांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्र

सैनिक स्कूल सातारात सहावी, नववीच्या प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू; २ डिसेंबर अंतिम मुदत



सातारा, दि. १२ :सैनिक स्कूल सातारा येथे शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी इयत्ता सहावी आणि नववीच्या प्रवेश परीक्षेची ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रवेशासाठी ३ नोव्हेंबर २०२६ पासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत २ डिसेंबर २०२६ रोजी रात्री ११.५० वाजेपर्यंत आहे.इयत्ता सहावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे वय ३१ मार्च २०२७ रोजी १० ते १२ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. तर इयत्ता नववीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे वय १३ ते १५ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे.इच्छुक पालकांनी निर्धारित मुदतीत आपल्या पाल्याचे ऑनलाइन अर्ज भरावेत. प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती, पात्रता निकष तसेच अर्जासंदर्भातील शंकांचे निरसन करण्यासाठी राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.अधिकृत संकेतस्थळ : https://exams.nta.nic.in/sainik-school-society/शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टाळण्यासाठी पालकांनी लवकरात लवकर अर्ज भरून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सैनिक स्कूल सातारा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

जलद वार्ता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर सह राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ताज्या घडामोडी सर्वात आधी LIVE महाराष्ट्र २४ वर


आपत्कालीन हेल्पलाईन: पोलीस ११२ • रुग्णवाहिका १०८ • अग्निशामक १०१ महिला १०९१ • बाल १०९८

राज्य, प्रशासन व राजकीय घडामोडी

विशेष वृत्त

महाराष्ट्र

मतदारांसाठी महत्त्वाची बातमी! प्रारूप यादीत नाव वगळले गेले? अंतिम यादीत नाव नोंदविण्याची पुन्हा संधी!



१३ नोव्हेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करा; ३० नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणारसातारा, दि. १२ : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सातारा जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) सुरू आहे. या प्रक्रियेत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या गैरहजर, स्थलांतरित, मृत किंवा दुबार (ASDD) वर्गवारीतील मतदारांना अंतिम मतदार यादीत नाव नोंदविण्याची आणखी एक संधी देण्यात आली आहे.आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार नागरिकांना १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. दाखल दावे व हरकतींवर २५ नोव्हेंबरपर्यंत सुनावणी घेऊन निर्णय करण्यात येणार असून, ३० नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांची कारणांसह यादी सातारा जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडेही ही यादी पाहण्यासाठी उपलब्ध आहे.गणना प्रपत्र भरून दिलेले असूनही ASDD यादीत नाव समाविष्ट झाल्यामुळे प्रारूप मतदार यादीत नाव आलेले नाही, अशा मतदारांनी अंतिम यादीत नाव नोंदविण्यासाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) किंवा मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी: https://www.satara.gov.in/

२४ कॅ. सोने: ₹७९,५००/१० ग्रॅम • **चांदी: ₹९६,०००/किलो** • **सेन्सेक्स: ८१,३४० (+२४५)** **हवामान: कोरडे व आल्हाददायक • कमाल ३१°C**

संपादकीय विचार मंच (Editorial Column) • LiveMaharashtra24 विशेष विचार व सखोल विश्लेषण

सत्य व निर्भीड पत्रकारिता:
डिजिटल युगात माहितीचा महापूर असताना वाचकांपर्यंत केवळ अचूक, सत्य आणि निष्पक्ष बातमी पोहोचवणे हे आमचे सर्वोच्च कर्तव्य आहे. सामान्य नागरिकांचा आवाज शासन व प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी LiveMaharashtra24.com कटिबद्ध आहे.

महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास:
राज्यातील कृषी, उद्योग, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या समतोल विकासासाठी सर्वसमावेशक धोरणांची गरज आहे. ग्रामीण व शहरी महाराष्ट्रातील ज्वलंत समस्यांचे सखोल विश्लेषण आमच्या विशेष वार्ताहरांद्वारे सातत्याने मांडले जाते.

वाचकांचा अतूट विश्वास:
वाचकांनी दिलेला विश्वास हेच आमचे सर्वात मोठे भांडवल आहे. निःपक्षपाती बातम्या, तात्काळ घडामोडी आणि दर्जेदार माहिती एका क्लिकवर वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी आमची पत्रकारिता सदैव तत्पर आहे.

वाचक माहिती कक्ष: ई-पेपर संदर्भातील सूचना व माहितीसाठी ई-मेल:
info@livemaharashtra24.com

२४ तास ताज्या बातम्या:
www.livemaharashtra24.com

A4 DIGITAL E-PAPER FORMAT